अटलजींबरोबरच व्यवस्थेचा भाग म्हणून!

एरवी टीव्हीवर तरी रामभाऊ काय बघतात? फक्त बातम्या. तेही थोडाच वेळ. मनोरंजनासाठी त्यांनी टीव्हीवर कुठला सिनेमा किंवा सिरीयल पाहिल्याचं सांगणारा माणूस शोधून सापडणार नाही. व्यसन असलंच तर ते सकाळी झाडून सगळे पेपर वाचण्याचं आणि काय सोडून द्यायचं याची त्यांची गणितं पक्की आहेत. वाचन म्हणाल तर कथा-कादंबऱ्या, मासिकं, फिक्शनं. चरित्र-आत्मचरित्र कशाकशाशी त्यांचा संबंध नाही. वाचतात काय, तर अहवाल, वेगवेगळ्या समित्यांनी केलेल्या नोंदी असलेला, फक्त जनहिताशी निगडित असलेला कामाचा मजकूर, सगळं लक्ष जनसेवा या एकाच गोष्टीवर केंद्रीत असल्यामुळेच मग त्यांना लोकांचं हित साधणारे आणि त्यापूर्वी कोणाचंही लक्ष न गेलेले विषय सुचतात. मग तो मुंबईसारख्या महानगरात कूपनलिका खणण्याचा असो की दुमजली शौचालयाचा. ५० वर्षे विज - वंचित राहिलेल्या अर्नाळा किल्ल्याला प्रकाशाची भेट देण्याचा असो की मुंबईच्या हद्दीत असून पिण्याच्या पाण्याला आसुसलेल्या गोराई-मनोरीकरांची तहान भागवण्यासाठी पाईपलाईनने त्यांच्या अंगणात गंगा नेण्याचा असो. बॉम्बेचे मुंबई करण्याचा असो की दुर्गम भागासाठी पाच किलोचा छोटा सिलिंडर प्रचलित करण्याचा असो, त्यांच्या डोक्यात असतो तो फक्त सामान्य माणसाचा विचार. अहोरात्र एकच विचार, जनहिताचा. पं.दीनदयाळ उपाध्यायांच्या अंत्योदयाच्या विचाराचा तो प्रभाव असावा.

नियमितपणा, वक्तशीरपणा आणि पारदर्शकता यात रामभाऊंचा हात धरता येणं ही कुणासाठीही प्रचंड अवघड गोष्ट आहे. विद्यार्थीदशेत सूर्यनमस्कारांमधून कमावलेलं आरोग्य त्यांना आजही साथ देतं. कर्करोगाचा अपवाद वगळला तर त्यांना आजही स्वतःसाठी डॉक्टरकडे जावं लागत नाही. केस शाबूत आहेत, दात मजबूत आहेत, सहस्त्र चंद्रदर्शनाच्या उंबरठ्यावर आवाज आणि दृष्टी दोन्ही व्यवस्थित आहेत. जिभेचे चोचले पुरवण्यासाठी बाहेर खाण्याचा मोह टाळण्याचं ते फळ असावं. हॉटेलात जेवायला जाणं हा रामभाऊंच्या नावडीचा विषय. त्यांनाही सुग्रास रुचकर जेवण आवडतं, पण ते घरातलं. गोळ्याच्या आमटीपासून पिठल्यापर्यंत आणि पीठ पेरून केलेल्या पातीच्या कांद्यापासून कवडी पडणाऱ्या दह्यापर्यंत. भाकरी अन् तेल तिखट मसाला हे त्यांच्यासाठी पक्वान्नच जणू!

गप्पांची मैफल, गॉसिप हे विषय या माणसाच्या आयुष्यात कधी डोकावलेसुद्धा नाहीत. पण लाइफस्टाइल म्हणाल तर फक्त साधेपणाशी नातं सांगणारी लोकप्रतिनिधी मंत्री असतानाही घरून जेवणाचा डबा नेणाऱ्या रामभाऊंनी अनेक वेळा लाल दिव्याची गाडी बाजूला थांबवून डबा खाल्लेला आहे. वेळेअभावी कधी-मधी लोकलमध्ये मोटरमन किंवा गार्डच्या डब्यात उभ्या उभ्या तव्यावरच्या पिठल्याचा डबा फस्त केला आहे. सुरुवातीला अनेक वर्ष हाफ शर्ट आणि पँट. नंतर झब्बा-लेंगा अन् अलीकडच्या काळात दुटांगी धोतर आणि झब्बा. पायात साध्याशा चपला किंवा सॅण्डल्स आणि डोळ्यांवर साध्या फ्रेमचा चारचौघांसारखा चष्मा. खिशाला वीस-पंचवीस रुपयांचं पेन हा त्यांचा डिझायनर अवतार. दाढी करायला ब्रश, पेस्ट आणि आफ्टरशेव म्हणून तुरटी ही त्यांची आवडती टॉयलेटरी. वाहनंही साधं. जास्तीत जास्त कार्यकर्ते कसे बसतील याचा विचार करून घेतलेलं. त्यांची डायरी आदर्श असते. प्रत्येक कार्यक्रम, बैठक, सभा-संमेलनांची नोंद त्यात न चुकता सापडते. व्यक्तिगत भेटीगाठींपासून घरच्यांच्या वाढदिवसांपर्यंत असंख्य नोंदी त्यात सापडतात. वेळ गाठण्यासाठी आजही लोकल, बस. प्रसंगी कुणाच्या तरी स्कूटरवरून जाण्यात त्यांना काहीच वेगळं वाटत नाही. नवं तंत्रज्ञान जर कामाच्या क्षमतेत भर टाकणारं असेल तर त्याचा स्वीकार करायला ते नेहमीच उत्सुक होते, आहेतही. कोणतंही काम नीटनेटकेपणानं निर्दोष व्हायला हवं हा त्यांचा कटाक्ष आजही कायम आहे. ए.जी.च्या ऑफिसात नोकरी करताना रामभाऊंना पाच रुपयांचं बक्षीस मिळालं होतं ते टाचण्यांऐवजी स्टेपलरचा वापर करण्याच्या मौल्यवान सूचनेसाठी! कागदपत्रं आणि स्टेशनरीचं. यांच्या बॅगेतल्या भंगाराची रामभाऊंचे सख्खे मित्र रामभाऊ कापसे अनेकदा टिंगल करायचे. ते म्हणायचे यांनी ब्रीफकेसऐवजी खरं तर ट्रंकच वापरायला हवी.

लोकसभेच्या निवडणुकीत पराभूत झाल्यानंतरही रामभाऊंचं जनसेवेचं व्रत अविरत सुरू आहे. कुष्ठरोगी, मच्छिमार अशा वंचित वर्गांसाठी लढणं सुरू आहे. पद न घेता अनेक संस्थांना वाढीचा मार्ग दाखविणे सुरू आहे. आपला राजकीय वारसा घरातल्या कुणी चालवावा हा मोह त्यांना कधी झाला नाही. फक्त आणि फक्त लोकांचा विचार करीत जगणाऱ्या या माणसाच्या लाइफस्टाइलचं कुणाला आकर्षण वाटणार नाही. कारण ही लाइफस्टाइल अनुकरण करायला कमालीची अवघड आहे आणि ती पैशानं विकत घेता येत नाही. अशी दुर्मिळ लाइफस्टाइल या माणसानं हातभर सहज अंगावर वागवली. जस्ट सिम्पल..बट सिम्पली ग्रेट!

**- चंद्रशेखर कुलकर्णी, मुंबई.**

**चंद्रशेखर कुलकर्णी हे राम नाईकांचे जावई आहेत**